आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२० जून २०२५ - शुक्रवार

<u>ठळक बातम्या</u>

- मध्यस्थांना दूर करून नाफेड लवकरच शेतकऱ्यांकडून थेट शेतमाल खरेदी करणार असल्याची केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची घोषणा

- ५ वर्षांच्या खंडानंतर कैलास मान सरोवर यात्रेसाठी भारतीय भाविक चीनमध्ये रवाना

- शेअर बाजारात मोठी तेजी, सेन्सेक्स ८२ हजार आणि निफ्टी २५ हजारांच्या पलीकडे

- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशविदेशात उद्या विविध कार्यक्रमांचं आयोजन

आणि

- इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतीय फलंदाजांची दमदार सुरुवात

<><><><><>

कृषी उत्पादनाच्या खरेदी प्रक्रियेतले मध्यस्थ दूर करून नाफेड लवकरच शेतकऱ्यांकडून खरेदी करायला सुरुवात करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज केली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रीय परिसंवादात ते आज मुंबईत बोलत होते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची योग्य किंमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले,

होल्ड... बाईट- अमित शहा (१९ सेकंद)

सहकार सूत्रावर आधारित विमा कंपनीही सरकार लवकरच सुरू करणार असल्याचं शहा यांनी सांगितलं. देशभरात दोन लाख नव्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था स्थापन करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. येत्या १० वर्षांत निर्यात, सेंद्रीय अन्न आणि बियाणं या तीन क्षेत्रांमधल्या मोठ्या सहकार संस्था देशात उभ्या राहतील आणि शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी अमूल्य योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना महाराष्ट्राला लाभलेला १२० वर्षांचा सहकार चळवळीचा इतिहास अधोरेखित केला.

देशाची अन्नसुरक्षा अबाधित राखणं, शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं, देशवासीयांना पोषणयुक्त आहार देणं आणि पृथ्वीचं हित जपणं ही सरकारसमोरची प्रमुख उद्दिष्टं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या परिषदेत केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात राबवलेल्या विविध योजनांच्या केंद्रस्थानी अल्पभूधारक शेतकरी असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. प्रयोगशाळांमध्ये संशोधन करणारे कृषी वैज्ञानिक आणि शेतात काम करणारे शेतकरी यांच्यातलं अंतर कमी करण्यासाठी सरकारनं विशेष योजना राबवल्याचा उल्लेखही केंद्रीय कृषिमंत्र्यांनी केला.

नाफेडच्या पाच उत्पादनांचं लोकार्पण, तसंच पाच शेतकरी उत्पादक कंपन्यांना अनुदान किंवा समभागांचं वाटपही मान्यवराच्या हस्ते यावेळी झालं.

<><><><><><>

गेल्या ११ वर्षांत बिहारला समृद्धी आणि विकासाच्या मार्गावर नेणारं राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार हे विकासाचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. बिहार इथे सिवानमध्ये एका जाहीर सभेला ते संबोधित करत होते. त्यांनी सिवान इथून ५ हजार ९०० कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं दूरस्थ पद्धतीने उद्घाटन आणि पायाभरणी केली. यामध्ये विविध नवीन रेल्वे गाड्यांचा शुभारंभ, प्रधानमंत्री घरकूल योजना, नमामी गंगे योजनेअंतर्गत ६ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचं उद्घाटन इत्यादी विकासकामांचा समावेश आहे. यावेळी त्यांनी विरोधकांवर टीका केली.

त्यानंतर भुवनेश्वरमध्ये त्यांनी १८ हजार ६०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि लोकार्पण केलं. भाजपाच्या नेतृत्त्वामधल्या सरकारला ओडिशामध्ये एक वर्ष झाल्याच्या निमित्तानं आयोजित विविध कार्यक्रमात त्यांनी सहभाग नोंदवला. देशातली नक्षलवादाची समस्या लवकरच संपुष्टात येईल, असं ते म्हणाले.

<><><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज देहरादूनमध्ये राष्ट्रपती तपोवन आणि राष्ट्रपती निकेतनचं उद्घाटन केलं. इथे असलेल्या जैव विविधतेची माहिती देणाऱ्या पुस्तकाचं प्रकाशन त्यांच्या हस्ते झालं. तसंच राष्ट्रपती उद्यानाचं भूमीपूजन त्यांनी केलं. दिव्यांग व्यक्तींसाठीच्या संस्थेलाही त्यांनी भेट दिली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

<><><><><><>

कैलास मान सरोवर यात्रा आजपासून सिक्कीम इथून सुरू झाली. सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथुर यांनी आज सकाळी नथु ला मधून जाणाऱ्या ३६ यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. या तुकडीत ४३ ते ६९ वर्ष वयोगटातले सदस्य असून त्यातल्या १३ महिला आहेत. ही तुकडी ११ ते १२ दिवसात यात्रा पूर्ण करुन गंगटोकला परत येईल. नथु ला खिंडीच्या दुसऱ्या टोकाला चीनच्या अधिकाऱ्यांनी यात्रेकरुंचं स्वागत केलं. तिबेटच्या स्वायत्त प्रदेशातली कैलास मानसरोवर यात्रा पाच वर्षांच्या कालावधीनंतर यंदा होत आहे.

<><><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने MyGov अँपच्या सहकार्याने नागरिकांना सर्जनशील 'बदलता भारत मेरा अनुभव' या मोहिमेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या दूरदर्शी नेतृत्वाची ११ वर्षे, अभूतपूर्व विकास आणि परिवर्तनाची वर्ष साजरी करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येत आहे. इंस्टाग्राम रील, यूट्यूब शॉर्ट, शॉर्ट एव्ही, ब्लॉग आणि विकसित भारत प्रश्नमंजुषा अशा पाच स्पर्धा याअंतर्गत होणार आहेत. संशोधक, व्लॉगर्स, लेखक, ब्लॉगर्स, प्रभावशाली आणि उत्साही कथाकारांसह सर्व नागरिकांना #BadaltaBharatMeraAnubhav हॅशटॅग वापरून स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. विजेत्यांना पाच हजार रुपयांपासून ते तीन लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

<><><><><><>

इस्राइल - इराण संघर्षामुळं सलग तीन दिवस घसरलेल्या देशातल्या शेअर बाजारात आठवड्याच्या शेवटच्या सत्रात मोठी तेजी झाली. त्यामुळं सेन्सेक्स पुन्हा ८२ हजार आणि निफ्टी २५ हजाराच्या पलीकडे जाऊन बंद झाला.

इराणसोबत चर्चेची दारं अजून खुली असून इस्राइलला पाठिंबा देण्यावर २ आठवड्यात निर्णय घेऊ असं अमेरिकन म्हटल्याचा सकारात्मक परिणाम शेअर बाजारांवर झाला. सेन्सेक्स दिवसअखेर १ हजार ०४६ अंकांनी वधारुन ८२ हजार ४०८ अंकांवर बंद

झाला तर निफ्टी ३२० अंकांनी वधारुन २५ हजार ११२ अंकांवर स्थिरावला. बांधकाम, वित्तीय सेवा, वाहन, आरोग्य क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग मोठ्या प्रमाणात वधारले.

<><><><><>

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उद्या २१ जूनला साजरा होणार आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, योग प्रात्यक्षिकांमधे भाग घेणार आहेत. आंध्र प्रदेशातले २ कोटींहून अधिक जण या सोहळ्यात सहभागी होतील, असं आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू म्हणाले. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर योग दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. उद्याच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश- विदेशातून नोंदणी करणाऱ्या योग अभ्यासकांची संख्या १० लाखांच्या पुढे गेली आहे.

योग दिनानिमित्त पुरातत्व विभागाच्या सर्व ऐतिहासिक स्थळांमध्ये नागरिकांना मोफत प्रवेश मिळेल. मुंबईत एलिफंटा लेण्यांसह देशभरात अनेक ऐतिहासिक स्थळांवर योग प्रात्यक्षिकांचं आयोजन करण्यात आलं आहे. *संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या उद्या पुण्यात मुक्कामी आहेत. यानिमित्ताने राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य वारकरी भक्तीयोग उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, योग अभ्यासक असे साधारण दहा लाख साधक योगसाधना करणार आहेत. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी योग ही एक जीवनशैली आहे असं सांगत योगाभ्यासाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचं आवाहन केलं आहे....*

होल्ड बाईट

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तेंडुलकर-अँडरसन चषक पाच कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज इंग्लंडमधे लीड्स इथं हेडिंग्ले मैदानावर सुरु झाला. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

भारताचा धावसंख्या ९१ झाली असताना के एल राहुल ४२ धावांवर बाद झाला, तर त्यानंतर आलेला साई सुदर्शन शून्यावर बाद झाला. मात्र त्यानंतर यशस्वी जैस्वाल आणि

कर्णधार शुभमन गिल यांनी दमदार फलंदाजी करत धावसंख्या वाढवली. जैस्वालनं शतक, तर गिलनं अर्धशतक पूर्ण केलं आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा, भारताच्या २ बाद २१५ धावा झाल्या होत्या. १२ जूनला अहमदाबाद येथे झालेल्या विमान अपघाताबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी दोन्ही संघातले खेळाडू दंडाला काळी पट्टी बांधून मैदानात उतरले.

<><><><><><>

देशविदेशातही निमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन होतं आहे. नेपाळमधल्या भारतीय दुतावासानं आज पोखरा इथल्या फेवा सरोवर परिसरात योगसत्र आयोजित केलं होतं. या सत्रात शेकडो योगप्रेमी सहभागी झाले होते.

सौदी अरबमधला भारतीय दूतावासानं रियाध इथल्या प्रिन्स फैझल बिन फहाद क्रीडा संकुलाच्या क्रीडांगणात योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं आहे. कतारमध्ये दोहा इथं आयडियल इंडियन स्कूलच्या प्रांगणात योगदिन साजरा केला जाणार आहे.

//<><><><><><>//